## -: महाराष्ट्र गट-क सेवा परीक्षा:-

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

१.१ राज्य शासनाच्या सेवेतील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येतात:-

| अ. क्र. | पदाचे नांव | संवर्ग | वेतनबँण्ड व ग्रेड वेतन | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | **दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क** | गट-क अराजपत्रित | रुपये ५२००-२०२०० + ग्रेड वेतन ३५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार निरीक्षक, गट ब व त्यावरील पदे. | राज्य शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| २ | **कर सहायक** | | रुपये ५,२०० - २०,२००+ ग्रेड वेतन २,४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्यकर निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित). | राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. |
| ३ | **लिपिक-टंकलेखक** | | रुपये ५,२०० - २०,२००+ ग्रेड वेतन १,९०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक कक्ष अधिकारी किंवा लघुलेखक तसेच पदोन्नतीसाठी सेवाप्रवेश नियमानुसार उपलब्ध असलेल्या संबंधित कार्यालयातील पदावर | फक्त मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयात. |

१.२ शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

२.१ प्रस्तुत तीनही पदावरील भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

२.२ संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते यांपैकी एक, दोन किंवा तीनही पदांसाठी बसू इच्छितात की काय, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

२.३ संबंधित पदाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधीत पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

२.४ संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे तीनही पदांकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

२.५ संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित पदाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.६ तीनही पदांकरीता मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक १ सामाईक असेल व सदर पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येईल.**

**२.७ मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक २ मात्र संबंधित पदांच्या कर्तव्ये व जबाबदा-या विचारात घेऊन स्वतंत्रपणे घेण्यात येईल.**

२.८ संबंधित पदाच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे उमेदवारांची मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

२.९ मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

२.१० पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

२.११ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व माहिती अंतिम समजण्यात येईल व त्याच्या आधारेच पुढील भरती प्रक्रिया होईल.

२.१२ संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर करताना दिलेला/ले विकल्प व अर्जामध्ये नमूद माहिती यामध्ये बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही.

**३. अर्हता:-**

**३.१ शैक्षणिक अर्हता:-**

३.१.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

३.१.२ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.१.३** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.१.४** उमेदवाराला मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**३.२ दुय्यम निरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| पुरुष | महिला |
|---|---|
| (१) उंची - किमान १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - किमान ७९ से.मी. आणि फुगवून त्यापेक्षा ५ से.मी. जास्त. | (१) उंची - किमान १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) वजन- किमान ५० कि.ग्रॅ. |

**३.३ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी टंकलेखन अर्हता:-**

**३.३.१ कर सहायक व लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे टंकलेखन अर्हता असणे आवश्यक आहे:-**

| कर सहायक | लिपिक-टंकलेखक | |
|---|---|---|
| | मराठी | इंग्रजी |
| मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट **आणि** इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा | मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. | इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उद्देशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषित केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**३.३.२** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एसपीई १०१२/(१०८/१२)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ नुसार अथवा तदनंतर शासनाने वेळोवेळी आदेश काढून विहित केलेली संगणक टंकलेखन अर्हता- बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी ३० शब्द प्रति मिनिट अथवा बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग इंग्रजी ४० शब्द प्रति मिनिट (लागू असेल त्याप्रमाणे) समकक्ष अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहे.

**३.३.३** शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाची उपरोक्त टंकलेखन अर्हता मुख्य परीक्षेकरीता अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक आहे.

**३.३.४ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट (केवळ लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-**

**(१)**विकलांग उमेदवाराने विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल तर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अपंग-२०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ नुसार टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी देण्यात येतील.

**(२)**माजी सैनिक वर्गातून अर्ज करण्यास पात्र असलेल्या उमेदवारांनी विहित टंकलेखन अर्हता धारण केली नसेल अशा उमेदवारास, सदर अर्हता त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अकरा महिन्याच्या कालमर्यादेत प्राप्त करील या अटीवर सदर पदासाठीच्या स्पर्धा परीक्षेकरीता अर्ज करण्यास तात्पुरती परवानगी दिली जाईल.

**३.३.५** लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली, १९९१ मधील नियम ३ व ४ नुसार एतदर्थ मंडळाची प्रति मिनिट ३० शब्द गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक, इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन, मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत)(सुधारणा) नियम २०१७ मधील तरतुदीनुसार ज्या इंग्रजी लिपिक-टंकलेखकांनी मूळ नियुक्तीच्या वेळी यथास्थिती, शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांच्या कालावधीत मराठी टंकलेखनाचे ३० शब्द प्रति मिनिट गतीचे अथवा अधिक गतीचे “शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र” धारण केले असेल, अशा इंग्रजी लिपिक-टंकलेखकांना एतदर्थ मंडळाची ३० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

४. **शुल्क (फी):-**

४.१ प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | शुल्क रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | अमागास | मागास | माजी सैनिक |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३७४ | २७४ | २४ |
| २ | मुख्य परीक्षा (प्रत्येकी) | ५२४ | ३२४ | २४ |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड),वि.मा.प्र.,इ.मा.व.,प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर)मोडणाऱ्या उमेदवारांनी, त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** क्रीमी लेअर संदर्भातील उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्‌अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रत्यावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**५. संयुक्त पूर्व परीक्षा:-**

**५.१ परीक्षा योजना:-**

**प्रश्नपत्रिका:-** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय व संकेतांक | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक ०१२) | १०० | १०० | बारावी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**५.२ अभ्यासक्रम:**-प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| (१) | **चालु घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील |
| (२) | **नागरिकशास्त्र** - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन) ग्राम व्यवस्थापन (प्रशासन) |
| (३) | **इतिहास:**-आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास |
| (४) | **भूगोल (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) —**<br>पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या,उद्योगधंदे, इत्यादी |
| (५) | **अर्थव्यवस्था-**<br>**भारतीय अर्थव्यवस्था**-राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी<br>**शासकीय अर्थव्यवस्था**-अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी. |
| (६) | **सामान्य विज्ञान-**<br>भौतिकशास्त्र(Physics),रसायनशास्त्र(Chemistry),प्राणिशास्त्र(Zoology),वनस्पतीशास्त्र(Botany),आरोग्यशास्त्र (Hygiene) |
| (७) | **बुध्दिमापन चाचणी व अंकगणित**<br>**बुध्दिमापन चाचणी**-उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न<br>**अंकगणित-** बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी. |

**५.३ परीक्षा केंद्र:-**

**५.३.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बीड | १६ | मुंबई (मध्य) | ३० | ठाणे | ४३ |
| भंडारा | १७ | मुंबई (पश्चिम) | ३१ | वर्धा | ४४ |
| बुलढाणा | १८ | नागपूर | ३२ | वाशिम | ४५ |
| चंद्रपूर | १९ | नांदेड | ३३ | यवतमाळ | ४६ |
| धुळे | २० | नंदुरबार | ३४ | पालघर | ४७ |
| गडचिरोली | २१ | नाशिक | ३५ | नवी मुंबई | ४८ |
| गोंदिया | २२ | उस्मानाबाद | ३६ | | |
| हिंगोली | २३ | परभणी | ३७ | | |

**५.३.२** उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.३.३** उपरोक्त परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.३.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.३.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.३.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल:**

**५.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.४.२** भरावयाच्या प्रत्येक संवर्ग/पदाकरीता स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**५.४.३** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज करताना उमेदवारांकडून घेतलेल्या विकल्पाच्या आधारे तसेच प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता (दुय्यम निरीक्षक, कर सहायक व लिपिक-टंकलेखक) भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची स्वतंत्र सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.४.४** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.५** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.६** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याचे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.४.८** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा:-**

**६.१** प्रत्येक पदाकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**६.२ परीक्षेस प्रवेश:-**

**६.२.१** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या मर्यादेनुसार पात्र ठरणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

६.२.२ मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

६.२.३ संबंधित संवर्ग/पदाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारास प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे अर्ज सादर करुन प्रत्येक संवर्ग/पदाच्या परीक्षेसाठी स्वतंत्र विहित परीक्षा शुल्क भरावे लागेल.

६.२.४ प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता नसल्यास व शैक्षणिक अथवा टंकलेखन अर्हता, मुख्य परीक्षेकरीता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.३ परीक्षा योजना:**

**६.३.१ मुख्य परीक्षेचे टप्पे-१ लेखी परीक्षा**

**६.३.२ लेखी परीक्षेचे एकूण गुण-२००**

**(१)संयुक्त पेपर क्रमांक-१ (१०० गुण)**

**(२)प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र पेपर क्रमांक-२ (प्रत्येकी १०० गुण)**

**६.३.३ प्रश्नपत्रिकांची संख्या:-दोन; पैकी पेपर क्रमांक १ तीनही पदाकरीता संयुक्त, पेपर क्रमांक २ तीनही पदाकरीता स्वतंत्र.**

**६.३.४ दुय्यम निरीक्षक, कर सहायक, लिपिक-टंकलेखक मुख्य परीक्षा संयुक्त पेपर क्रमांक-१**

**६.३.४.१ प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक ००२) | मराठी | ६० | ६० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ४० | ४० | पदवी | इंग्रजी | | |

**६.३.४.२ अभ्यासक्रम:**- सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पेपर क्रमांक - १ |
|---|---|
| १. | **मराठी:**-सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २. | **इंग्रजी:**-Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

**६.३.५ दुय्यम निरीक्षक मुख्य परीक्षा स्वतंत्र पेपर क्रमांक-२**

**६.३.५.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ (संकेतांक ५०६) | सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे/विषयासंबंधीचे ज्ञान | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.३.५.२ अभ्यासक्रम:**- सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:-

| पेपर क्रमांक - २<br>सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल. | |
|---|---|
| १ | **चालू घडामोडी- जागतिक तसेच भारतातील** |
| २ | **बुध्दिमत्ता चाचणी** — उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न. |
| ३ | **भारतीय राज्यघटना:-**<br>घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे/ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे- शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |

| | |
|---|---|
| ४ | **माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम, २०१५** |
| ५ | **संगणक व माहिती तंत्रज्ञान**- <br>आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य. |
| ६ | **मानवी हक्क व जबाबदाऱ्या:-** <br>संकल्पना- आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदा-या, यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान. |
| ७ | **The Bombay Prohibition Act, 1949** |
| ८ | **The Maharashtra Excise Manual, Volume-I** |
| ९ | **The Maharashtra Excise Manual, Volume-II** |
| १० | **The Maharashtra Excise Manual, Volume-III** |

### ६.३.६ कर सहायक मुख्य परीक्षा स्वतंत्र पेपर क्रमांक-२

**६.३.६.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २<br>(संकेतांक ५०७) | सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे/विषयासंबंधीचे ज्ञान | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.३.६.२ अभ्यासक्रम:**-सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | घटक/ उपघटक |
|---|---|
| १ | **नागरिकशास्त्र-** राज्य व्यवस्थापन (प्रशासन), नागरी व ग्रामीण व्यवस्थापन (प्रशासन) |
| २ | **भारतीय राज्यघटना**:- <br>घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे/ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे- शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |
| ३ | **पंचवार्षिक योजना** |
| ४ | **चालू घडामोडी**- जागतिक तसेच भारतातील |
| ५ | **बुध्दिमत्ता चाचणी व मूलभूत गणितीय कौशल्य** |
| | **५.१ बुध्दिमत्ता चाचणी** — उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न. |
| | **५.२ मूलभूत गणितीय कौशल्य**-Basic Numeracy/Numerical Skill-numbers and their relations, orders of, magnitude, etc (Class X level) |
| ६ | **अंकगणित**- गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक व टक्केवारी, गुणोत्तर व प्रमाण, वेळ व अंतर, नफा-तोटा, सूट, व्याज, वेळ व काम, आलेख, सरासरी, महत्वमापन व क्षेत्रमापन, इत्यादी. |

| | |
|---|---|
| ७. | **पुस्तपालन व लेखाकर्म** (Book-Keeping & Accountancy) — लेखाकर्म अर्थ, लेखा संज्ञा, द्विनोंद पध्दतीची मुलभूत तत्वे, लेखाकर्माकरिता दस्तऐवज, रोजकिर्द, सहाय्यक पुस्तके, खतावणी, बँक मेळजुळणी पत्रक, तेरीज पत्रक, घसारा, अंतिम लेखे, वित्तिय विवरणपत्रके तयार करणे, नफा न कमविणा-या संस्थांची खाती.<br>Bookkeeping meaning & definition, Accounting terminology, Fundamentals of Double Entry, Source documents for accounting, Journal, Subsidiary Books, Ledger, Bank Reconciliation Statements, Trial Balance, Depreciation, Final Accounts, Preparing Financial Statements, Accounts of non-profit-making organizations. |
| ८. | **आर्थिक सुधारणा व कायदे** - पार्श्वभूमी, उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST, विक्रीकर, VAT. |

**६.३.७ लिपिक-टंकलेखक मुख्य परीक्षा स्वतंत्र पेपर क्रमांक-२**

**६.३.७.१** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ (संकेतांक ५०८) | सामान्य क्षमता चाचणी व पदासंबंधीचे/विषयासंबंधीचे ज्ञान | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.३.७.२ अभ्यासक्रम:-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | घटक/ उपघटक |
|---|---|
| १ | **सामान्य ज्ञान — इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र इ.** |
| २ | **बुध्दिमापन विषयक प्रश्न -** उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न. |
| ३ | **गणित**-अंकगणित,बीजगणित, भूमिती, सांख्यिकी. |
| ४ | **सामान्य विज्ञान-** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व पर्यावरण. |
| ५ | **चालू घडामोडी-** भारतातील व महाराष्ट्रातील. |
| ६ | **माहिती व संपर्क तंत्रज्ञानासंबंधी प्राथमिक ज्ञान** |
| ७ | **क्रीडा व साहित्य क्षेत्रातील पुरस्कार व माहिती** (भारतातील व महाराष्ट्रातील) |
| ८ | **माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क आधिनियम, २०१५.** |

**६.४ परीक्षा केंद्र:-**

**६.४.१** प्रस्तुत दुय्यम निरीक्षक, कर सहायक तसेच लिपिक-टंकलेखक पदावरील भरतीकरीता मुख्य लेखी परीक्षा खालील चार ठिकाणी घेण्यात येतील:-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | १५ |
| मुंबई | ३० |

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| नागपूर | ३२ |
| पुणे | ३८ |

**६.४.२** उपरोक्त परीक्षा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेकरिता अर्ज/माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.४.३** उपरोक्त परीक्षा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.४.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.४.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल, असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.४.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**७. पदांचा पसंतीक्रम (केवळ लिपिक-टंकलेखक पदाकरीता):-**

**७.१** मुख्य परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना ज्या पदासाठी अर्ज केला आहे, ते पद (लिपिक-टंकलेखक मराठी अथवा इंग्रजी) नमूद करणे आवश्यक आहे. तसेच, दोन्ही पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्याप्रमाणे नमूद करणे आवश्यक आहे.

**७.२** दोन्ही पदांसाठी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी पदांचा पसंतीक्रम दर्शविणे आवश्यक आहे. अशा प्रकारे पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी खालील अटींवर देण्यात येईल:-

(१) पसंतीक्रम ऑनलाईन पध्दतीने मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच अर्जामध्ये दर्शविणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम दर्शविलेल्या पदाकरीता टंकलेखनाचे विहित मर्यादेचे अर्हता प्रमाणपत्र नसल्यास संबंधित पदाचा पसंतीक्रम रद्द करण्यात येईल.

(३) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

**८. लेखी परीक्षेचा निकाल:-**

**८.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**८.२** मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार यादी (Merit List)तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

**८.३ संयुक्त पेपर क्रमांक-१ तसेच प्रत्येक संवर्ग/पदाकरीता स्वतंत्रपणे घेण्यात येणा-या पेपर क्रमांक-२ चे गुण एकत्रित करुन प्रत्येक परीक्षेची निकाल प्रक्रिया स्वतंत्रपणे राबविण्यात येईल.**

**८.४** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू, माजी सैनिक व विकलांग व्यक्ती इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**८.५** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पात्र समजण्यात येईल.

**८.६** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**८.७** विकलांग, माजी सैनिक अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**९. शिफारस:-**

**९.१** "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल.

**९.२** सर्व पदांकरीता लेखी परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे.

**९.३** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवारांच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय- किमान ३० शतमत

(३) विकलांग- किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू- किमान २० शतमत

(५) माजी सैनिक- किमान २० शतमत

**९.४** लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे (गुणवत्ता यादीनुसार) उपलब्ध पदांएवढ्या उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**९.५** शिफारसप्राप्त प्रत्येक उमेदवारास आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे व आयोगाकडील नोंदणीकृत क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल तसेच शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**१०. शारीरिक क्षमता:-**

दुय्यम निरीक्षक पदावर शिफारस झालेल्या उमेदवारांची शारिरिक क्षमतेबाबतची मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. अर्जातील दाव्यानुसार विहित शारीरिक क्षमता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**११. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**११.१** शिफारसपात्र उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी सक्षम प्राधिका-याकडून बोलविण्यात येईल.

**११.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे सक्षम प्राधिका-याकडून तपासली जाईल.

**११.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**११.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**११.**५वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाआधारे पात्र ठरणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका-याकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच सक्षम प्राधिका-याने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेत घेण्यात येईल. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**११.६** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

ठिकाण:मुंबई
दिनांक: २० मार्च, २०१८

सुनिल अवताडे
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग